सोमवार, दि. २१ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३४६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## खड्डे बनत आहे जीवघेणे!

### आमच्या जीवाशी का खेळता; ड्रायवर संघटनांचा संतप्त सवाल



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** टेंभुर्णी ते जालना रोड वरती टेंभुर्णी हून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या अकोला देव जवळील मुख्य रस्ता वरील वळणावरील पुलावर पडलेल्या मोठ मोठ्या खड्याने वाहन चालक आणि वाहन मालक मोठे त्रस्त झाले आहे. या मोठ मोठ्या खड्यामुळे लहान मोठ्या वाहनाचा अपघात सुरू असून वाहनाचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने ड्रायवर संघटना च्या पदाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली असून या बाबत ते लवकर आक्रमक पवित्र घेणार असल्याचे सांगितले.

या खड्या बाबत त्यांनी सोशल मिडिया मध्ये ही बाब निदर्शनास आणल्यानंतर खड्डे बुजविल्या चे थातुर मातुर काम करून वेळ मारून नेली होती मात्र **पान २ वर**

## जालना शहर महानगरपालिकेत करोडोचा घोटाळा; आम आदमी पार्टीचा गंभीर आरोप

### स्थानिक स्वराज्य संस्था भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर अन् स्वबळावर लढणार



**जालना । प्रतिनिधी -** आम आदमी पार्टी जालना शहर महानगर पालीकेच्या सर्व जागा लढविणार असून जालनेकरांना नवा पर्याय उपलब्ध करुन देणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून मिळून मिसळून वाटाघाटी करुन जनतेची लुट आणि नागरी सेवा देण्यापासून वंचित ठेवलेल्या जनतेला सर्व सुख-सोई उपलब्ध करुन देण्यासाठी आम आदमी पार्टी निवडणूकीच्या रिंगणात उतरणार आहे असे आम आदमी पार्टीचे महानगर अध्यक्ष संजोग हिवाळे यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे . पुढे असे म्हणाले कि जालना शहर महानगरपालिका आणि तत्कालीन नगरपालिका प्रशासनाने सन २०१३ ते २०२२ पर्यंत विविध विभागाच्या माध्यमातून सुमारे ५० कोटी रुपयाचा घोटाळा केल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टीचे जालना शहर महानगराध्यक्ष संजोग हिवाळे आणि जालना शहर महानगर महासचिव तनुज बाहेती यांनी केला आहे. दरम्यान त्यांनी पत्रकार परिषदेत भ्रष्टाचाराचे पुरावे देखील सादर केले.

जालना शहरातील विकास कामे आणि विविध विभागाच्या अंतर्गत करण्यात आलेल्या कामात प्रचंड घोटाळा करण्यात आला असल्याचे आम आदमी पार्टीने म्हटले आहे. यामध्ये निवडणूकीसाठी बेकायदेशीर आणि नियमबाह्य खर्च, गणवेश खरेदी घोटाळा, घंटागाडी खरेदी घोटाळा यासह विविध विषयाच्या संदर्भात केलेल्या खर्चात घोटाळा करण्यात आला आहे. शिवाय जालना महापालिकेच्या गलथान कारभाराचे देखील त्यांनी वाभाडे काढले. आम आदमी पार्टीने केलेल्या दाव्यानुसार माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीप्रमाणे पालिकेकडे सन २०१४-१५ आणि २०१५-१६ चे अभिलेखेच उपलब्ध नाहीत. विशेष म्हणजे बांधकाम, रस्ता अनुदान, दलित सुधारणा योजना, स्वच्छता निधी, वाहन दुरुस्ती-वाहन भाडे, वाहन इंधन, सीएफ फंड, आमदार फंड, १३ वा वित्त आयोग यासह २०१४ चा निवडणूक खर्च, वेतन भत्ते व पेंन्शन, ग्रंथालय, पाणी पुरवठा किरकोळ दुरुस्ती व सबमर्सीबल पंप बसविणे, पाणी पुरवठा व टँकर भाडे अशा विविध विभागाअंतर्गत खर्च करण्यात आला आहे. मात्र ती कामे कुठे केली, कधी केली, आणि कोणत्या कामावर किती खर्च केला याची कोणतीही माहिती, ठराव किंवा कोणतेही तत्सम अभिलेखे उपलब्ध नाहीत. या दोन वर्षात सुमारे १४ कोटी रुपयाची अफरातर करण्यात आली **पान २ वर**

### पत्रकार परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे

**निवडणूक खर्चातील अपारदर्शकता (२०११, २०१६-१७):**
मंडप, चहा-पाणी, वीज, फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी यासाठी ६० लाखांहून अधिक खर्च
**दुसऱ्यांदा फक्त फोटोग्राफीसाठी ६ लाखांहून अधिक खर्च**
संगणक, CCTV, LED, प्रिंटर, स्कॅनर इ. साहित्य किरायाने घेतले - किंमती खरेदीच्या तुलनेत जास्त
**अवास्तव गणवेश व साडी खरेदी (२०१३-२०१५):**
दोन वर्षांत ३२ लाखांहून अधिक रुपये खर्च
**कर्मचारी संख्येच्या तुलनेत वस्तूंची संख्या जास्त**
मागणीपत्र, निविदा, पावत्या, स्टॉक बुक, वितरण नोंदी यांचा अभाव
**एकाच कंत्राटदाराकडून खरेदी**
**अभिलेख (रेकॉर्ड्स) उपलब्ध नसणे (२०१४-१६):**
१४ कोटीहून अधिक निधी खर्च झाल्याचा उल्लेख पण पुरावे/अभिलेख गायब
विविध योजना - रस्ते, दलित योजना, स्वच्छता निधी, ML fund, वाहतूक इंधन इ. साठी दिलेला निधी
लेखा परीक्षकांकडून संशय व्यक्त
**घनकचरा व्यवस्थापनासाठी वाहन खरेदी घोटाळा (२०१६-१७):**
१४व्या वित्त आयोगाच्या निधीतून वाहन खरेदी
किंमती बाजारभावापेक्षा १८.६०% जास्त
टाटा ACE घंटा गाडी एका अशा कंपनीकडून खरेदी जिच्याकडे वाहन विक्रीचा परवाना नव्हता

### आम आदमी पक्षाने घेतलेल्या आक्षेपाचे मनपाकडून खंडन

## निवडणुक काळातील खरेदी दर जास्त असल्याची शक्यता ही व्यक्त

**जालना । प्रतिनिधी -** आम आदमी पक्षाने मनपा प्रशासनाविरोधात विविध मुद्द्यांच्या आधारे कामात अनियमितता, भ्रष्टाचार, अपारदर्शकता असल्याचा गंभीर आरोप रविवार (दि २०) रोजी पत्रकार परिषदेच्यामाध्यमातून केला. त्यानंतर मनपा प्रशासनाने सर्व आक्षेपांचे खंडन केले आहे. याबाबत जालना शहर मनपाचे प्रशासकीय अधिकारी विजय फुलंब्रीकर यांनी प्रसिद्धी पत्रक काढले आहे.

त्यात म्हटले आहे की, कर्मचारी संघटनेच्या वेळोवेळी मागणी केल्यानुसार तथा शासन निर्णयांतर्गत कर्मचाऱ्यांचे राहणीमान व सुविधा अंतर्गत गणवेश पुरवठा करण्यात येतो. २०११ ते २०१५ पर्यंत शासनाने नियुक्त केलेल्या अंदाज समिती चौकशी प्रकरणात कोणत्याही प्रकारचा संशयात्मक व नियमबाह्य झालेली नोंद केलेली नाही. २१ फेब्रुवारी २०२२ रोजी या आक्षेपाचे पूर्ण निराकरण करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१६ ते २०१९ पर्यंत मा. विभागीय आयुक्त यांनी चौकशी केलेली आहे. सदर कालावधीत कुठल्याही प्रकारचा चौकशी समितीने आक्षेप नोंदविला नाही. त्यानुसार बहुतांशी आक्षेपाचे पुर्ण निराकरण करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५चे तरतुदीच्या अधिन राहून उपलब्ध नसलेले अभिलेखाबाबत तसेच शासन निर्णय व प्रचलित कायद्यानुसार संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांना उपलब्ध **पान २ वर**

युवा आदर्श

### काळी ...

वादग्रस्त वक्तव्ये
अधिवेशन काळी
वाचाळताचळाळे
जीभ अति काळी
महाउद्रेक माजवी
भाषा रे शिवराळी
आयते मिळे विषय
चालू पंगत फराळी
शुद्ध हवा प्रदुषित
उठू लागे वावटळी
जुने लफडे नव्याने
उन्मत्तते कवटाळी
झडते आरोप फैरी
काना पार किटाळी
सजून बसले पुढारी
मारे टाळीवर टाळी
खोदून काढ प्रकरणे
आज कुणाची पाळी
संतप्त तव्यावर ती
भाजे आपली पोळी
शांतता नको कुणां
सत्रे ठरावी वादळी
शब्द बनले अर्वाच्य
काना सतत आदळी
गरमागरम तव्यावर
भाजून घ्यावी पोळी
सांसदीय नियमांची
धडाधड पेटलीहोळी
नेमकी आता ऐकतो
अस्फुटशी किंकाळी
ताजीबनते रे बातमी
घडलेली कुणे काळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने जिल्हा माहिती कार्यालयामार्फत मंगळवार, दि. २२ जूलै, २०२५ रोजी जिल्ह्यातील पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सभागृहात सकाळी १० वाजता ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते होणार असून, उद्घाटन सोहळ्यास पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल आणि जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम. यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहेत. या कार्यशाळेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता तसेच सायबर सुरक्षा, ताणतणाव व्यवस्थापन तसेच अधिस्विकृती नियमावली, पत्रकार सन्मान योजना, पत्रकार कल्याण निधी या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी या कार्यशाळेस जालना जिल्ह्यातील सर्व पत्रकार, वृत्तपत्र प्रतिनिधी, संपादक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी केले आहे. तसेच शासनमान्य यादीवरील सर्व संपादकांनी स्वत: किंवा आपल्या प्रतिनीधीस या कार्यशाळेस उपस्थित राहण्यास सांगावे असे आवाहनही श्री सुर्यवंशी यांनी केले आहे.

### मराठवाडा व्यापार परिषदेस व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा प्रतिसाद

## व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध - शिरसाठ

### परिषदेच्या ठरावांचा मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार - सावे




**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यातील व्यापारी बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध असून, मुख्यमंत्री व व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी मुंबईला आमंत्रित करणार असल्याची ग्वाही पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी रविवारी दिली. तर व्यापार परिषदेच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या ठरावावर आमच्या सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी येथे दिले.

मराठवाडा चेंबर ट्रेड अँड कॉमर्सच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त मराठवाडा चेंबर व औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा व्यापार परिषद **पान २ वर**

## चुकीच्या बिलामुळे हैराण वीज ग्राहकांना; महावितरणविरोधात आदेशामुळे दिलासा

### ॲड. महेश धन्नावत यांच्या यशस्वी पाठपुराव्याने चुकीच्या बिलाला स्थगिती

**जालना । प्रतिनिधी -** महावितरणच्या अनागोंदीमुळे सामान्य नागरिक अडचणीत सापडल्याचा प्रकार जालना येथे उघडकीस आला आहे. महावितरणकडून एका ग्राहकास तब्बल ८२,३९० रुपयांचे चुकीचे वीजबिल पाठविण्यात आले होते. ग्राहकाने ॲड. महेश धन्नावत यांच्या माध्यमातून याविरुद्ध दिलेला लढा अखेर यशस्वी ठरला असून, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने चुकीच्या बिलाला स्थगिती दिली आहे. या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, जालना येथील महावीर चौकातील रहिवासी हेमंग मेहता **पान २ वर**



# संपादकीय

## निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉमिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सुंदर साजिरा श्रावण आला...

**।। श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे**
**क्षणात येते सर सर शिरवे,क्षणात फिरुनी उन पडे..।।**

श्रावण महिन्यात निसर्गाने आपले रूप बदललेले असते. श्रावण सरी कोसळतात. पाऊसही क्षणात येतो क्षणात जातो. सर्वदूर हिरवे गवताचे गालिचे पसरले असतात. म्हणूनच कवितेत वर्णन केले आहे..

हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमलीचे.....

श्रावण हा सणांचा राजा मानला जातो. श्रावणातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व वेगवेगळे आहे. वातावरण भक्तिमय झालेले असते. भक्तिचा सुगंध दरवळत असतो.

श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी जिवतीचे पूजन, आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे.आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे.

श्रावणात शिवपूजनाला खूप महत्त्व आहे.शक्य होईल तसे जोतिर्लिंगाचे दर्शन घ्यावे. त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, भीमाशंकर,या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.

अनेक ठिकाणी,मंदिरात, किंवा घरी,रुद्रपाठ करतात. श्रावणी सोमवार, मंगळागौर, जिवतीची पूजा, नृसिंह पूजन, जन्माष्टमी,(गोकुळाष्टमी)राखी पौर्णिमा, नारळीपौर्णिमा, बैल पोळा, या प्रमाणे श्रावणात सण-उत्सवही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.

नवविवाहित स्त्रियांनी श्रावणातील प्रत्येक मंगळवारी करावयाचे सौभाग्यदायी मंगळागौरी ह्या देवतेचे एक व्रत. या व्रतात शिव आणि गणपतीसह गौरीची पूजा करतात. लग्नानंतर पहिली पाच वर्षे किंवा सात वर्षे हे व्रत पाळल्यानंतर या व्रताचे उद्यापन करतात.

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील सण आहे.या दिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे.कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसापासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते.

नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करताना महिला पाटावर किंवा भिंतीवर नागाचे चित्र काढतात.

पेठ नाका (इस्लामपूर)पासून उजव्या बाजूला एक फाटा फुटतो. तेथून साधारण २० कि.मी वर बत्तीस शिराळा गाव आहे.

नागपंचमीच्या दिवशी शिराळा.जि.सांगली.गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जाई.

शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांतही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाखो लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीवप्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेशा मुळे

काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतीकात्मक मिरवणूक काढली जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो.हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

नारळी पौर्णिमा हा सण समुद्रकाठी राहणाऱ्या व प्रामुख्याने




मासेमारी करणाऱ्या मुख्य कोळी लोकांचा सण आहे.

नारळी पौर्णिमेच्या काही दिवस अगोदर कोळी बांधवांनी समुद्रात जाणे बंद केलं असते.

पावसाळ्यात समुद्रामध्ये मासेमारीसाठी उतरणारे कोळी लोकांना समुद्रापासून धोका असतो. त्यामुळे श्रावणी पौर्णिमेनंतर पावसाचा जोर थोडा कमी झालेला असतो. समुद्र हे वरून देवतेच्या वास्तव्याचे ठिकाण मानले जाते. समुद्राची कृपा कोळी लोकांवर रहावी. म्हणून रीतसर पूजा करून वाजत-गाजत सोन्याचा नारळ अर्पण करतात..

गोकुळाष्टमी हा श्रावण महिन्यात येणारा सर्व बालगोपाळांचा आणि गोविंदांचा आवडीचा सण आहे. कृष्ण जन्माच्या या दिवसाला श्रीकृष्ण जयंती, दहीहंडी, श्रीकृष्ण जन्माष्टमी असेही म्हणतात. या दिवशी भगवान श्रीकृष्णांचा जन्म मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपूर्ण भारतात साजरा केला जातो. श्रीकृष्णाचा जन्म श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्री, रोहिणी नक्षत्रावर चंद्र वृषभ राशीत असताना झाला. म्हणूनच या दिवशी गौळणींचा लाडका कान्हा श्रीकृष्ण याचा जन्मोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे.

कृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत असे पुराणात वर्णन आहे. तसेच भगवान श्रीकृष्ण हे वासुदेव आणि देवकीचे आठवे पुत्र होते. यादिवशी बरेचजण गोकुळाष्टमीचा उपवास करतात. सगळीकडेच यादिवशी लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत सर्वचजण 'आला रे आला गोविंदा आला' असा जयघोष करत असतात. दहीहांडी म्हटलं की, आपल्या सर्वांच्याच डोळ्यासमोर दिसतात त्या उंचच उंच दहीहंड्या आणि ती फोडण्यासाठी उभे असणारे गोविंदा.

भगवान श्रीकृष्णांना दही, दूध, लोणी हे पदार्थ खूप आवडत असे. श्रीकृष्ण हे चोरून दही खात असे त्यामुळेच कृष्णाला माखन चोर असेही म्हणतात. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला साजरा करतात. गोपाळकाल्याच्या दिवशी दही, दूध, लोणी आणि लाह्या, पोहे,दाणे,लोणचे,मीठ, यांचा काला गोपाळकाला' करून प्रसाद म्हणून सर्वांना वाटतात. तसेच पंजिरी-(धनापावडर,गुळ,खोबर ,सुंठ,खडीसाखर.)

यांच दिवशी दही दुधाने भरलेली हंडी उंच बांधून ही दहीहंडी सर्व गोविंदा एकत्र येऊन फोडतात.. आपल्या या भारतीय संस्कृतीमध्ये गोकुळाष्टमीला एक अनन्यसाधारण महत्व आहे. वृंदावन, मथुरा, गोकुळ, द्वारका या ठिकाणी तर हा सण खूप मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कारण याच ठिकाणी भगवान श्रीकृष्णांचे जन्मस्थान असल्यामुळे तिथे मोठ्या उत्साहात गोकुळाष्टमी साजरी होते.

हिंदू लोक श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी उपवास करतात. यादिवशी श्रीकृष्णाची पूजा करतात, रात्री उशिरापर्यंत जागतात आणि श्रीकृष्ण जन्माच्या वेळेला रात्री १२ वाजता प्रार्थना, पूजा करतात. कृष्णाच्या लहानपणीचा फोटो किंवा मूर्ती पाळण्यात ठेवतात.

आत्ताच्या या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रिय जगात गोकुळाष्टमी साजरी करताना,

दहीहंडी जास्त उंच न बांधता, खाली बांधून तिचा आनंद घ्यावा.जर उंच बांधली असेल तर संरक्षणासाठी उपाययोजना कराव्यात आणि मगच या दहीहंडी फोडण्याच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. कारण दरवर्षी बऱ्याच गोविंदांना यामध्ये आपला जीव गमवावा लागतो.नाचगाण्याचे बीभत्स कार्यक्रमास स्थान नसावे.

पोळा किंवा बैलपोळा हा श्रावण अमावस्येला बैलाची कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात,खांदेशात, भव्य पातळीवर साजरा केला जातो, ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलाची पूजा करतात.नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावस्येला संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा. ज्या दिवशी बैलांकडून कुठलेही कामकाज केले जात नाही त्याच्या मानेवर जू ठेवली जात नाही.पुरणपोळीचा नैवेद्य केला जातो.

असा हा व्रत वैकल्याचा सणांचा, आनंददायी, उत्सवाचा आणि उत्साहाचा श्रावण मासाचे २५ जुलै रोजी आगमन होत आहे.

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव, मोबा. ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

## पान १ वरुन

### जालना शहर ...

आहे. या संदर्भात लेखा परिक्षकाने केलेल्या लेखा परिक्षण अहवालात गंभीर शेरे ओढले असून त्याची पुर्तता करण्याच्या सुचना केल्या आहेत. मात्र त्यावर अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही, त्यामुळे त्याचा महापालिकेने खुलासा करावा असेही त्यांनी यावेळी सांगीतले.

यावेळी निवडणूकीवर सुमारे १ कोटी ९ लाख ६६ हजार ४० रुपये खर्च करण्यात आलेत. यामध्ये ज्या वस्तु भाडेतत्वावर घेण्यात आल्या होत्या, त्याच्या बाजार भावापेक्षा जास्त दराने त्या वस्तुवर जास्त किराया देण्यात आला. गणवेश खरेदी करताना दोन वर्षात सुमारे ३२ लाख ७७ हजार १२९ रुपये खर्च करण्यात आलेत. विशेष म्हणजे गणवेश खरेदीची कोणतीही मागणी नव्हती, त्याचे ठराव किंवा मागणी पत्र पालिकेकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही खरेदी मागणी नसतांनाही करण्यात आली. पालिकेत काम करणार्यांकची संख्या आपण अंदाजे ५०० ग्रहीत धरली तरी एका गणवेशावर ६ हजार ५५४ रुपये खर्च होतो. हे तर्कसंगत नाही. त्याचा खुलासा महापालिकेने करावा.

पालिकेने शहराच्या विविध भागासाठी सन २०१६-१७ मध्ये सुमारे १६ घंटागाड्या खरेदी केल्या आहेत. त्या घंटागाडीची खरेदी ही ८० लाख ३६ हजार ३५२ प्रमाणे खरेदी करणे अपेक्षीत होते, मात्र त्या गाड्या १८.६० टक्के जास्तीच्या दराने, म्हणजेच ९५ लाख ३१ हजार २०० रुपये दराने खरेदी केल्या आहेत. म्हणजेच पालिकेला १४ लाख ९४ हजार ८४८ रुपये जास्तीचा भार सोसावा लागला. त्याचाही खुलासा पालिकेने करावा असे संजोग हिवाळे आणि तनुज बाहेती यांनी म्हटले.

दरम्यान आम आदमी पार्टीच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका या स्वबळावर लढणार असल्याचेही जाहिर करण्यात आले.

यावेळी आम आदमी पार्टीचे संजोग हिवाळे, तनुज बाहेती, फेरोज बागवान, रवि सुर्यवंशी, अंकुश कांबळे,बोरेसे सर, सुभाष बोर्डे, अजितदादा कोठारी यांची उपस्थिती होती.

### निवडणुक काळात ...

करुन देणे बाबत निर्देश देण्यात येणार असून उपलब्ध करुन न दिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही नमूद केले आहे.

वाहन खरेदीही नियमानुसार तसेच मा. विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेनुसार घेतलेली असल्याने आम आदमी पक्षाने उपस्थित केलला प्रश्नच लागू होत नसल्याचेही श्री फुलंब्रीकर यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

निवडणुक काळात सीसीटीव्ही कॅमेरे, एलईडी टिव्ही, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर आदी साहीत्य तत्कालीन नगर परिषदेकडे उपलब्ध नसल्यामुळे ई-निविदा द्वारे व महाईटेंडर निविदा दर निश्‍चित करण्यात आलेले होते. निवडणुकीच कामे व सेवा निवडणुक काळात २४ ब ७ उपलब्ध करुन तसेच विना विलंब पुरवठा करावा लागतो. त्यामुळे या कामाचे दर हे निविदाधारकांकडून जास्त असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही प्रसिध्दी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### व्यापाऱ्यांच्या समस्या ...

रविवारी 'मसिहा'च्या श्रीमती रत्नप्रभा बाळासाहेब पवार सभागृह चिकलठाणा येथे आयोजित केली होती. यावेळी मंत्री महोदय बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा चेंबर ट्रेड अँड कॉमर्स अँड एग्रिकल्चर मुंबईचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार हे होते. तर उदघाटक व प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री संजय शिरसाठ, कॅबिनेट मंत्री अतुल सावे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठवाडा चेंबरचे माजी अध्यक्ष सत्यनारायण लाहोटी उपस्थित होते. तर महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, मराठवाडा चेंबरचे माजी अध्यक्ष तनसुख झांबड, कल्याण बरकसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात मराठवाड्यातील सर्व जिल्हा व तालुका पातळीवरील ३०० पेक्षा अधिक व्यापारी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. या परिषदेत मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा यांनी एकूण दहा ठराव मांडले. त्यास व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वानुमते मंजुरी दिली. परिषदेत शेवटी मराठवाडा चेंबरचे महासचिव श्यामसुंदर लोया यांनी आभार प्रदर्शन केले. परिषदेस हिंगोलीचे व्यापारी महासंघचे अध्यक्ष तथा माजी आ. गजानन घुगे, नांदेडचे जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, सुबोध काकाणी, परभणीचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत हाके पाटील, जालन्याचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष संजय कांकरिया, बीडचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, धाराशिवचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव आदी उपस्थित होते. परिषद यशस्वी करण्यासाठी मराठवाडा चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत राठी, सचिव संतोष कावळे पाटील, कोषाध्यक्ष विकास साहुजी, संजय दाड, संजय मोदाणी, जपर मिर्जा , संदीप लाहोटी, औरंगाबाद व्यापार महासंघाचे महासचिव शिवशंकर स्वामी व इतर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

**व्यापार परिषदेत मांडण्यात आलेले दहा ठराव**

महाराष्ट्रातील व्यवसाय कर रद्द करण्यात यावा.

कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापारी वर्गातून दोन व्यापारी प्रतिनिधी निवडून दिले जातात. त्याची संख्या तीन करावी व त्यांना सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक लढवण्याची परवानगी देण्यात यावी.

महानगरपालिका व नगरपालिका हद्दीत कुठलाही आस्थापना कर लावू नये. कर लावल्यास त्याला विरोध केला जाईल.

व्यापारी आस्थापनावर लावलेल्या सोलार सिस्टिमने उत्पादित केलेल्या वीज वापरण्यावर कुठलेही बंधन टाकू नये.

कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापाऱ्यांना दुहेरी फीस लागत आहे. ती लागू नये अशी मागणी सरकारकडे करण्यात येणार आहे.

इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात वीजदर अधिक आहे. त्यामुळे उत्पादन व विक्री खर्च वाढत असल्यामुळे व्यापारी वर्ग इतर राज्याच्या व्यापारी वर्गाच्या स्पर्धेत टिकू शकत नाही. वीज दर कमी करण्यात यावे.

व्यापारी वर्गासाठी एक कल्याण मंडळ स्थापन करण्यात यावे.

कामगार विमा (एड्ख) हा व्यापाऱ्यांना काढावा लागतो. पण त्याचा फायदा कामगारांना होत नाही. त्यामुळे हा कायदा रद्द करण्यात यावा.

ट्रेडिंगचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याला लागणारे कर्ज गृहकर्जाच्या व्याजदराप्रमाणे दिले जावे.

नाबार्डची रद्द केलेली योजना पुन्हा सुरू करण्यात यावी.

**व्यापाऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे - मानसिंह पवार**

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे असून, कालानुरुप व्यापाऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानांशी जळवून घेत स्वत:ला अपग्रेड करणे गरजेचे आहे. तरच आगामी काळात व्यापारी तग धरु शकतील. अन्यथा स्पर्धेतील टिकणे अवघड होईल. त्यामुळे व्यापाऱ्यांनी एआय सारख्या तंत्रज्ञानाचा वापर आपल्या समस्या सोडविण्यासाठी करावा. त्याचप्रमाणे मजबूत संघटन असल्याशिवाय आणि आक्रमक धोरण स्वीकारल्याशिवाय व्यापाऱ्यांच्या समस्या सुटू शकणार नाहीत. त्यामुळे मराठवाड्यातील व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवायच्या असतील तर मजबूत संघटन बांधणी करणे आवश्यक आहे. सपूर्ण मराठवाड्यातील जिल्हा आणि तालुकास्तरावर संघटनेचे कार्यालय असणे नितांत आवश्यक आहे. कार्यालय झाले तरच मजबूत संघटन बांधणी होऊ शकेल आणि पर्यायाने समस्या सुटण्यास मदत होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार यांनी केले.

### चुकीच्या बिलामुळे ...

याना दरमहा नियमितपणे सरासरी २८८० रुपयाचे वीजबिल येत होते, वीज वापरही केवळ ३३३ युनिट्स इतकाच होता. मात्र, एक दिवस त्यांना अचानक ८२,३९० रुपयांचे प्रचंड बिल पाठवण्यात आले. हे पाहून त्यांनी महावितरणकडे चौकशी केली असता, त्यांच्या नावावर मागील वर्षी मामा चौक परिसरातील एका दुकानाचे बिल जोडले गेले असल्याचे उघड झाले. यावर त्यांनी वकील ड. महेश धन्नावत यांच्यामार्फत महावितरणला नोटीस बजावली. या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले की, ग्राहकाची सरासरी बिल रक्कम दोन ते चार हजार दरम्यान असताना एवढे प्रचंड बिल कसे आले? महावितरणकडून कोणताही स्पष्ट प्रतिसाद मिळाला नाही. अखेर ड. धन्नावत यांनी ग्राहक तक्रार निवारण आयोगाचा दरवाजा ठोठावला. जिल्हा ग्राहक तकार निवारण मंचाच्या अध्यक्षा अपर्णा काटे, सदस्य उदय दळवी व संतोष निकुले यांनी महावितरणच्या विरोधात आदेश देत चुकीच्या वीज बिलाला स्थगिती दिली.

या प्रकरणातून ग्राहकांनी धडा घेऊन अशा चुकीच्या बिलांविरोधात न घाबरता ग्राहक आयोगात तक्रार दाखल करावी, असे आवाहन ड. महेश धन्नावत यांनी केले आहे.

### खड्डे बनत ...

हे खड्डे अजून वाढले असून या मुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सार्वजनिक रस्ता विभागाने लक्ष्य देऊन हे खड्डे चांगले बुजवून सामान्य जनतेला न्याय देण्याचे करावे अशी मागणी जोर धरत आहे. आमच्या जीवाशी खेळण्याचा तुम्हाला काही अधिकार नसून जर हे खड्डे तत्काळ बुजवले नाही तर टेंभुर्णी सह परिसरातील चालक मालक संघटना आंदोलनाच्या पावित्र्यात असून मोठे आंदोलन उभारून ही मागणी पूर्ण करून घेऊ असे त्यांनी सांगितले आहे.

खराब रोड आणि खड्डे आमचा कधी पिछा सोडणार माहीत नाही. आमची अडचण किती ही मांडली तरी कोणी लक्ष्य देत नाही. पडलेले खड्डे या मुळे आमच्या वाहनांचा मोठा मेंटेनन्स वाढला आहे.आमच्या वाहनाची सारखी ना दुरुस्ती सुरू असते. खड्डे बुजविल्यास आमचे वाहन भी चांगले राहील आणि अपघात ही होणार नाही त्या मुळे तात्काळ ही खड्डे बुजविणे गरजेचे असल्याचे वाहनधारक अल्केश सोमानी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

# कृषी सेवा केंद्राने शेतकऱ्यांची अडवणूक थांबवावी

## अन्यथा स्वाभिमानी स्टाईलने उत्तर दिल्या जाईल - मयुर बोर्डे



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** जाफराबाद कृषी अधिकारी कार्यालयात शेतकरी संघटनेचे कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले, खरीप हंगामातील पिकांना युरिया घेण्यासाठी शेतकरी कृषी सेवा केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी करत असून कृषी दुकानदार शेतकऱ्यांची अडवणूक करत आहेत. खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांना वेठीस धरून जास्त दराने खतांची विक्री केली जात आहे. तसेच युरिया उपलब्ध असताना देखील शेतकऱ्यांना तो दिल्या जात

नाही किंवा युरिया पाहिजे असेल तर त्या सोबत दुसरे खत घ्यावे लागेल अशी सक्ती दुकानदार करतात तसेच प्रत्येक बॅग मागे शंभर रुपये ते दीडशे रुपये जास्त घेऊन शेतकऱ्यांची लूट करत आहे. त्याचबरोबर बोगस कंपन्या खेड्यात जाऊन दलालांच्या मार्फत शेतकऱ्यांना बोगस खते व औषधी विकत आहेत हा सर्व प्रकार मयुर बोर्डे यांनी कृषी अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिला आणि आपण याकडे तात्काळ लक्ष घालावे या सर्व प्रकाराला आळा घालावा अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना आपल्या स्टाईलने उत्तर दिले जाईल असे मयुर बोर्डे यांनी सांगितले. या प्रसंगी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष सुदाम शेवत्रे, तालुका अध्यक्ष समाधान गाढवे, संपर्क प्रमुख भाई प्रदीप नरवाडे, तालुका उपाध्यक्ष, आकाश मुरकुटे, विधानसभा संपर्क प्रमुख गणेश मुरकुटे, तालुका उपाध्यक्ष राजु बनकर, रामदास शेवत्रे, सतीश गायकवाड, गजानन कोथळकर, सतीश मुरकुटे इत्यादीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## भगवानसिंग इंगळे यांनी जोपासलेली सामाजिक बांधिलकी

# दौलतपुरा शाळेत १८६ विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्य वाटप



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद शाळेच्या भौतिक विकासासाठी भगवानसिंग इंगळे यांनी जोपासलेली सामाजिक बांधिलकी कौतुकास पात्र असल्याचे प्रतिपादन जाफराबाद तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रकाश मिरगे यांनी केले. निर्मल सीड्स चे विभागीय व्यवस्थापक भगवानसिंग इंगळे यांनी जाफराबाद येथील दौलतपुरा जिल्हा परिषद शाळेतील १८६ विद्यार्थ्यांना रजिस्टर,पाणी बॉटल, कंपास पेटी,रंग पेटी आदी साहित्य वाटप करून आपला वाढदिवस साजरा केला. बुधवारी ता.१६ आयोजित या कार्यक्रमात श्री मिरगे बोलत होते.यावेळी

कार्यक्रमास केंद्रप्रमुख एस. टी .काळे,सेवानिवृत मुख्याध्यापक बाळासाहेब वाघ, प्रा.पांडुरंग राऊत, चेतन बायस, उध्दव बढे, पांडुरंग गवळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल मोरे, निकेश ठाकूर, राहुल सदावर्ते,श्री आंधळे दादाराव राऊत यांची प्रमुख उपस्थिती यावेळी श्री मिरगे पुढे म्हणाले की जिल्हा परिषद शाळांच्या भौतिक विकासासाठी मिळणारा निधी व अनुदान अतिशय तोकडे असते, यासाठी समाजातील दानशुरांनी पुढे येऊन शाळा व विद्यार्थी विकासाला हातभार लावावा असे ते म्हणाले.श्री इंगळे हे गेली ११ वर्ष दरवर्षी विद्यार्थी उपयोगी साहित्य वाटप करून आपली सामजिक बांधिलकी जोपासतात.याशिवाय त्यांनी या शाळेला पाण्याची टाकी, टिव्ही संच, वर्ग खोली च्या फर्निचर साठी ५१ हजार रुपये,पिण्याच्या पाण्याचा बोअर दिला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव शिंदे यांनी केले.कार्यक्रमासाठी श्रीमती वंदना पाटील, श्रीमती प्रतिभा राजपूत, श्रीमती छाया पुंगळे, श्रीमती संगीता पडघन,श्रीमती प्रज्ञा लोखंडे,शीतल इंगळे यांनी परिश्रम घेतले.

## हिंदू एकता आंदोलन पक्षाचे पदाधिकाऱ्यांचा मेळावा

**पुणे -** हिंदू एकता आंदोलन पक्षाचे पदाधिकाऱ्यांचा भव्य मेळावा शुक्रवार दि. १८ जुलै रोजी पुण्यातील श्रेयस सिद्धी बँक्वेट हॉल, स्वारगेट येथे संपन्न झाला. सदर मेळाव्या दरम्यान नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करण्यासाठी पक्षांचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग भाऊ बावरी आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुदर्शन अण्णा शितोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नांदखेडा येथे ५०० कचराकुंडीचे वाटप



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** नांदखेडा येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ५०० कचराकुंडी गट ग्रामपंचायत मध्ये सरपंच बाबासाहेब सवडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी उपस्थित मध्ये ग्रा.प. सदस्य अरुण सवडे, ग्रा.पं. सदस्य योगेश सवडे, ग्रा.प. सदस्य राजू वाघ, ग्रामसेवक मदन डोईफोडे, पंढरीनाथ म्हस्के म नसे तालुका सरचिटणीस, ग्राम पंचायत कर्मचारी आत्माराम सवडे, मारोती सवडे, पंडित सवडे, विलास सवडे, भगवान कांबळे, बालाजी जंजाळ, बबन जंजाळ, विठोबा खरात, जनार्दन म्हस्के, लिंबाजी सवडे, बाबुराव हिवाळे, दिपक माळी, बालाजी देठे, मनोहर सवडे, सुरेश सवडे, केशव पवार, प्रल्हाद कांबळे, संतोष खरात, शिवाजी खरात, मुरलीधर सवडे, लिंबाजी सवडे, सुखदेव सवडे, दौलत खरात उपस्थितीत सर्व गावकरी महिला पुरुष उपस्थित होते.

# दिव्यांगाच्या मानधनात १ हजार रुपयांची वाढ

## आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी जल्लोष

**जालना । प्रतिनिधी -** संजय गांधी निराधार योजने मधुन अपंगांना १५०० रुपये मानधन मिळत होते. त्यामध्ये वाढ व्हावी यासाठी दिव्यांगानी मागणी केली होती.आमदार खोतकर यांनी यासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा केला शासनाने या मागणीची दखल घेतली व मानधनात १ हजार रुपयांची वाढ करुन दिव्यांगाना मोठा दिलासादिला त्यामुळे जालन्यातील सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने दिनांक २० रोजी जल्लोष साजरा केलाय. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे मेघराज चौधरी आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या आर्थिक सहाय्यासाठी दिले जायचे. जालन्यातील दिव्यांग बांधवांच्या सातत्याने पाठपुरावा केला. दिव्यांगांच्या पाठपुराव्याला आज अखेर मिळणार आहे. आमदार अर्जुन खोतकर यांनी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करत सन्मान केला आहे.



महायुती सरकारचे आभार मानले आहेत. निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना सरकारकडून आधी १ हजार ५०० रुपये प्रति महिन्याला यश आले आहे. निराधार योजनेच्या पातळ लाभार्थ्यांना आता दीड हजार ऐवजी अडीच हजार रुपये मानधन प्रति महिन्याला सरकारकडून सरकारच्या या निर्णयाचे जालन्यातील दिव्यांगांनी स्वागत करत जल्लोष साजरा करून महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहेत. महायुती सरकारने संजय गांधी निराधार योजनेत एक हजार रुपयात वाढ केल्याने यावेळी महानगरपालिकेत विष्णू पाचफुले यांना महापौर करण्यासाठी दिव्यांग बांधव तळागाळा पर्यंत काम करणार असल्याची प्रतिक्रिया दिव्यांग बांधवांनी दिली आहे यावेळी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे शिवसेना दिव्यांग सेलचे जिल्हाध्यक्ष अनिल मगदूले शंकर शिरगुळे रवी तायडे सुरेश बोर्डे अंकुश वाकचौरे शेख इस्माईल किरण शिरसाट दीपक खांडेभराड रेखा तौर राम खांडेभराड पांडुरंग खैरे आयुष राठोड शंकर घारे आदींची उपस्थिती होती

# अग्रवाल समाजाचा राष्ट्रीय ओबीसी सुचीत समावेश करावा ॲड. धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** अग्रवाल समाजाचा राष्ट्रीय ओबीसी सुचित समावेश करण्यात यावा, अशी मागणी अग्रवाल समाजाच्यावतीने ड. महेश धन्नावत यांनी राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे सदस्य हंसराज अहिर यांच्याकडे केली आहे.



हंसराज अहिर जालना दौऱ्यावर आले असता, ड. धन्नावत यांनी त्यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बिहारमध्ये अग्रवाल समाज ओबीसीत मोडतो. तरी देखील इतर राज्यात मोठ्या संख्येने वास्तव्यास असलेल्या या समाजाला जनरल कॅटेगरीमध्ये स्थान आहे. ही बाब विचारात घेता सर्व राज्यात हा समाज मोठ्या प्रमाणात विखुरलेला असल्याने समाजाचा राष्ट्रीय ओबीसी सूचित समावेश करावा, अशी विनंती ड. धन्नावत यांनी केली. यावेळी हंसराज अहिर म्हणाले की, स्वतःला सक्षम करण्यासाठी समाजाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. राज्य शासनाकडून जर अग्रवाल समाजाच्या ओबीसी समावेशाबाबत निवेदन प्राप्त झाले, तर त्यावर नक्कीच विचार केला जाईल. अशा मागण्या योग्य पद्धतीने नोंदविल्या गेल्यास, त्या पुढील प्रक्रियेसाठी मार्गदर्शक ठरतात. कोणताही निर्णय सर्वेक्षणाच्या आणि वस्तुनिष्ठ अहवालाच्या आधारेच घेतला जातो, असा सकारात्मक प्रतिसाद त्यांनी दिला. दरम्यान, ही मागणी सध्या चर्चेत असून समाजाकडून केंद्र व राज्य शासनाकडे पुढील हालचालीसाठी प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती ड. महेश धन्नावत यांनी दिली, यावेळी उद्योजक अर्जुन पित्ती, डॉ. शिवदत्त विजयसेनानी, सुनील खरे, श्याम सारस्वत, डॉ. सचदेव उपस्थित होते.

# अजितदादांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सर्वच जाती पंताला समान सन्मान - सुनील तटकरे

## वाटुर येथील राष्ट्रवादी कार्यकर्ता मेळाव्याला प्रतिसाद

**परतूर । प्रतिनिधी -** राज्यातील व केंद्रातील प्रगतीचे शिखर गाठणारी महायुती सरकार यामध्ये उपमुख्यमंत्री अर्थमंत्री व राष्ट्रवादीची धुरा सांभाळणारे अजित दादा पवार हे राज्यात काम करत असताना सर्व समाजातील घटकांना समान हक्क न्याय व सन्मान मिळावा यासाठी कार्य करत असल्याची प्रतिपादन खासदार तथा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले.

माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांच्या पुढाकाराने वाटुर येथे आयोजित राष्ट्रवादी कार्यकर्ता मेळाव्याला ते संबोधित करत होते. यावेळी व्यासपीठावर महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण,आनंद परांजपे,ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे,प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी, आ. विक्रम काळे,जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण,जालना महानगराध्यक्ष रशीद भाई पैलवण, अल्प संख्याक जिल्हाध्यक्ष शहाआलम खान,बळीरामजी कडपे,रवींद्र तात्या तौर, जि.प.अध्यक्ष महेंद्रजी पवार, जयमंगलदादा जाधव,युवा जिल्हाध्यक्ष माऊली सरकटे,विधानसभा अध्यक्ष संभाजी खंदारे,जि.प. सदस्य दत्ताजी बनसोडे, इंद्रजित घनवट,महिला प्रदेश सरचिटणीस वंदना खांडेभराड मॅडम, महिला जिल्हाध्यक्ष मंगलताई पाटील,जालना निरीक्षक वैद्य मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी आपल्या प्रमुख मार्गदर्शन मनोगतात पुढे बोलताना खासदार तटकरे यांनी आमदार सुरेश कुमार जेथलिया यांचे कौतुक करत म्हटले की दौऱ्यावर कार्यक्रमानिमित्त मी आलो होतो सहसा माझ्या ठरलेल्या कार्यक्रमामध्ये मी इतर कोणताही कार्यक्रम सहभागी करत नसतो मात्र जेथलिया यांनी वाटूर येथे केवळ एक ते दोन तास थांबण्याची विनंती केली या कार्यक्रमाला गर्दी पाहता त्यांच्या कार्याची प्रचिती लक्षात येते असे ते म्हणाले. जालन्या जिल्ह्यामध्ये दुर्दैवाने महायुतीमध्ये राष्ट्रवादीला जागा जरी सुटली नाही तरी या परिसरामध्ये राष्ट्रवादी पक्ष बळकट असल्याचे ते म्हणाले. जेथलिया यांच्या नेतृत्वाखाली या मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी पक्षाला वेग निर्माण झाला असल्याची देखील कबुली त्यांनी दिली.

# शिक्षकांना BLO कामातून मुक्त करण्याची मागणी

## ‘हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन’ कडून मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना साकडे; शाळांतील अध्यापनावर परिणाम होतोय- शेख अब्दुल रहीम

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यातील शाळांतील प्राथमिक शिक्षकांना इडज (बूथ लेव्हल ऑफिसर) कामकाजातून तात्काळ मुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय, मुंबई येथे देण्यात आलेल्या निवेदनात शाळांतील शिक्षकांकडून सतत इडज काम घेतल्याने शैक्षणिक गुणवत्ता ढासळत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे.

या मागणीसाठी संबंधित निवडणूक विभागाचे प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी मा. एस. चोक्कलिंगम साहेब (भा.प्र.से.)तसेच उपसचिव तथा सह-मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांना भेटून सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले. तसेच वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आले आहे. शासकीय धोरणानुसार शैक्षणिक व अशैक्षणिक कामांचे वर्गीकरण करून बीएलओचे काम अशैक्षणिक असल्याचे धोरण ठरविण्यात आले असून देखील अद्याप शिक्षकांना बीएलओचे कामातून कार्यमुक्त करण्याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्याने शेख अब्दुल रहीम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुद्धा थेट पाठपुरावा केला आहे. शिक्षक बीएलओ कामात गुंतल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व शाळेतील शैक्षणिक प्रगतीवर गंभीर परिणाम होत आहे. शिक्षकांकडून इडज काम घेण्याऐवजी प्रशासकीय कर्मचारी नियुक्त करावेत, अशी ठाम भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

यासंदर्भात शिक्षण व निवडणूक विभागांच्या अधिकाऱ्यांनाही यापूर्वीही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. तरीही अद्याप योग्य तो निर्णय न झाल्यामुळे शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व शिक्षकांना इडज कामातून कायमस्वरूपी मुक्त करावे, अशी मागणी शेख अब्दुल रहीम यांनी पुन्हा केली आहे.

आता यावर संबंधित यंत्रणा काय निर्णय घेतात याकडे सर्व शिक्षकांचे लक्ष लागले आहे.



# शेतकऱ्यांच्या योजना हळू हळू बंद करण्याचं काम सुरु आहे; परंतु, योजना बंद केल्या तर मंत्रालयावर मोर्चा काढू - खा. डॉ. कल्याण काळे

## खासदार डॉ. कल्याण काळे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव; शुभेच्छा देण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची गर्दी

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांच्या योजना हळू-हळू बंद करण्याचं काम सरकारने सुरू केले आहे. एवढेच नाही तर लाडकी बहीण योजनेतील २० लाख नावांची कपात केली असून आणखी २० लाख नावांची कपात करण्याची शक्यता आहे. परंतु, सरकारने जर अशा योजना बंद करण्याचा प्रयत्न केला, तर मंत्रालयावर मोर्चा काढू, जनतेला वाऱ्यावर सोडू देणार नाही असा इशारा जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दिला.







जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री लॉन्स येथे अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. या अभिष्टचिंतन सोहळ्यात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. दरम्यान, शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दीही झाल्याचे पहायला मिळाले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी देखील खा. डॉ. कल्याण काळे यांना शुभेच्छा देण्यासाठी हजर होते.

त्यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका लढविल्या जाणार असल्याचेही सांगितले. शेतकऱ्यांच्या योजना हळू हळू बंद करण्याचं काम राज्य आणि केंद्र सरकारकडून सुरू असल्याचे त्यांनी म्हटले.

यावेळी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, उबाठा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्कराव अंबेकर, राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रामराव खडके, ज्ञानेश्वर भांदरगे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते इकबाल पाशा, माजी जि. प. सदस्य ज्ञानदेव पायगव्हाणे, रमेश गव्हाड, नवाब डांगे, राजेंद्र राख, कल्याण दळे, बबलू चौधरी, अब्दुल रशीद पहेलवान, शिवाजी शेजुळ, हरीहर शिंदे, रामधन काळंबे, जयप्रकाश चव्हाण, दिनेश काकडे, राम शिरसाट, कपील जिगे, विजय चौधरी, अजय बनकर, अरुण सरदार, कुंडलराव मुठे, विनोद यादव, त्र्यंबकराव पाबळे, अतिक खान, रमेश सपकाळ, मुरलीधर शेजुळ, कल्याण तारडे, मुरलीधर थेटे, समाधान शेजुळ, लक्ष्मण म्हसलेकर, बदर चाऊस, विनोद रत्नपारखे, जावेद भाई, आरेफ शेख, कृष्णा पाटील पडूळ, रहिम तांबोळी, रामजी सावंत, डॉ. बळीराम बागल, डॉ. खंडागळे, जीवण सले, कपील भुरेवाल, राजेश पवार, शकील शेख, शेख इब्राहीम, शेख अजहर, संजोग हिवाळे, तनुज बाहेती यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.